पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०५

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/०१/२०२२** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा मंगळवार दिनांक **१८/०१/२०२२** रोजी **दु.२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, शहर सुधारणा समिती यांचे दालनात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जानेवरी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा. सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.अनुराधा गणपत गोरखे - सभापती**
२. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
३. मा.साधना अंकुश मळेकर
४. मा.चोंधे आरती सुरेश
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

या शिवाय मा. उल्हास जगताप - नगरसचिव, मा. महाजन - कार्यकारी अभियंता, मा. सुनिल हरीदास - उप अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) शहरातील मुख्य रस्त्याच्या कडेला असणा-या झोपडपट्टी च्या दर्शनी भागावर सुशोभिकरणाच्या दृष्टीने रंगरंगोटी करणेबाबत.
मा.सोनाली गव्हाणे व मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ०४/०१/२०२२ रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्रमांक ०४** ) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १८/०१/२०२२

सुचक - मा.सोनाली गव्हाणे अनुमोदक - मा.वैशाली घोडेकर

संदर्भ - मा. सोनाली गव्हाणे व मा. वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य रस्त्याच्या कडेला असणा-या झोपड्यांना सुशोभिकरण करण्याच्या दृष्टीने व्यावसायिक कलाकार यांच्या मार्फत शहरातील झोपडपट्ट्यांची पाहणी करुन झोपडपट्टीच्या दर्शनी भागावर काही सुशोभिकरणाच्या दृष्टीने बदल करण्यास व त्याप्रमाणे रंगरंगोटी करणेस व त्यासाठी येणा-या आवश्यक त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **अनुराधा गणपत गोरखे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/२०/२०२२
दिनांक : १९/०१/२०२२

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.